# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांकः15.06.2025** **वारःरविवार**

---

आकाशवाणी, पुणे, प्रशांत जाधव प्रादेशिक बातम्या देत आहे….

ठळक बातम्या,

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशियाच्या दौऱ्यावर
- विद्यार्थ्यांचं परदेशी शिक्षणाचं स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार - मुख्यमंत्री फडणवीस यांचं प्रतिपादन
- योग ही विश्वशांतीसाठी भारताची जगाला भेट – केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव
- पुणे मॉडेल स्कूल आणि स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्राचं काल उद्घाटन
- जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत दक्षिण आफ्रिका विजयी.

<u>पंतप्रधान परदेश दौरा</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशियाचा पाच दिवसांचा दौरा आजपासून सुरू होत आहे. राजधानी निकोसिया इथं राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडौलिडेस यांच्याशी चर्चेनंतर पंतप्रधान लिमासोलमध्ये उद्योगपतींना संबोधित करतील. दोन्ही देशांचे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यासाठी तसंच भूमध्यसागरीय प्रदेश आणि युरोपियन युनियनशी भारताचे संबंध मजबूत करण्यासाठी या भेटीमुळं फायदा होईल.

दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्या निमंत्रणावरून पंतप्रधान मोदी उद्या कॅनडातील कानानास्किस इथं जी-7 परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेत मोदी विविध देशांच्या

नेत्यांशी विविध विषयांवर चर्चा करण्याबरोबरच द्विपक्षीय बैठकाही घेतील. 18 जून रोजी मोदी क्रोएशियाला भेट देतील. भारताच्या पंतप्रधानांनी क्रोएशियाला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

<u>परदेशी विद्यापीठ</u>

राज्य शासनानं राष्ट्रीय शिक्षण धोरणातंर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र प्रदान केल्यानं भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नसून आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचं भारतातील पहिलं शैक्षणिक केंद्र नवी मुंबईत उभारण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. हॉटेल ताज इथं 'मुंबई रायझिंग : क्रिएटिंग ॲन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या कार्यक्रमात पाच जागतिक विद्यापीठांना आशयपत्र प्रदान करताना फडणवीस बोलत होते. युनिव्हर्सिटी ऑफ ॲबर्डीन, युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क, युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया, इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन ही विद्यापीठं भारतात येत असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय शिक्षण सचिव आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष विनित जोशी यांच्यासह परदेशी विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

<u>योगकनेक्ट</u>

भारताने जगाला दिलेल्या योगमुळे विश्वाच्या कल्याणाची भारताची आकांक्षा दिसून येत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं आहे. .ते काल नवी दिल्ली इथं विश्व शिखर संमेलन – योग कनेक्ट कार्यक्रमात बोलत होते. तसच योग धर्म, लिंग आणि भाषेच्या सीमा ओलांडून जात असल्याचं सांगताना ते म्हणाले…

**योग डायबिटीज के प्रावधान, हृदय स्वास्थ्य में सुधार और यहां तक कि कैंसर रोगियों और बुजुर्गों को उनकी बीमारी से बेहतर तरीके से निपटने में मददगार है। योग सिर्फ आध्यात्मिक और ध्यान का ही अभ्यास नहीं है बल्कि यह स्वास्थ्य क्षेत्र में रोजगार के अपार अवसर भी प्रदान करता है।**

<u>पुणे मॉडेल स्कूल</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत बनवण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून महासत्ता होण्यासाठी वाटचाल करणा-या भारताला जागतिक ज्ञान आणि आरोग्य महासत्ता बनविण्याच्या दृष्टीनं शिक्षण आणि आरोग्य क्षेत्र महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहे, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात केलं.

जिल्हा परिषदेच्या वतीनं पुणे मॉडल स्कूल आणि स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्राचं उद्घाटन पवार यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याचं सांगून मराठी भाषा पुढील पिढीमध्ये रुजवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचं सांगताना ते म्हणाले...

**आपल्याला सगळ्यांना शैक्षणिक गुणवत्तेवर नव्याने लक्ष ठेवण्याची गरज आहे. नवीन नवीन शाळा येत राहाणार, इंग्रजी शाळेमध्ये टाकण्याचे प्रमाण पालकांचे वाढलेले आहे. त्याला गत्यंतर नाही, म्हणूनच आम्ही इंग्रजी शाळेमध्ये पहिलीपासून कम्पल्सरी मराठी हा विषय ठेवला आहे. आता नवीन मुलं इंग्रजी शाळेत शिकतात. काही काहींना मराठी वाचता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यांना मराठी लिहिता वाचता आलंच पाहिजे.**

यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार बापूसाहेब पठारे तसंच विविध अधिकारी तसंच मान्यवर उपस्थित होते.

अहमदाबाद विमान अपघात

अहमदाबाद इथं झालेल्या विमान अपघातानंतर देशात कार्यरत असलेल्या 34 बोईंग 787 विमानांची नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून सखोल परिक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. आतापर्यंत आठ विमानांची तपासणी झाल्याचं केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू यांनी काल सांगितलं. नवी दिल्लीत घेतलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. या दुर्घटनेच्या सखोल चौकशीसाठी केंद्रीय गृहसचिवांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समिती स्थापना केली असून त्यात केंद्र आणि गुजरात राज्य सरकारमधल्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. या समितीला तीन महिन्यांत सर्वंकष अहवाल देण्याच्या सूचना दिल्याचंही नायडू यांनी सांगितलं.

दरम्यान या अपघातातल्या मृतांची संख्या अडीचशेच्यावर गेली आहे. मृत प्रवाशांच्या कुटुंबियांना आणि जखमींना 25 लाख रुपये तातडीची मदत द्यायचा निर्णय एअर इंडियानं घेतला आहे. टाटा समूहानं या आधीच मृतांच्या कुटुंबांना एक कोटी रुपयांची आर्थिक मदत द्यायचा निर्णय घेतला होता.

वारी आढावा

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा 6 जुलै रोजी होत असून 26 जून ते 10 जुलै यात्रा कालावधी असेल. श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी सर्व मानाच्या आणि अन्य पालख्यांचं त्यांच्या नियोजित तिथीप्रमाणं पंढरपूरकडं प्रयाण होणार आहे. त्या अनुषंगानं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात एक आढावा बैठक घेतली. संपूर्ण वारी कालावधीत सर्व प्रकारच्या उत्कृष्ट सोयी सुविधा उपलब्ध करून

देण्यासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणेनं परस्परात योग्य समन्वय ठेवून आषाढी वारी निर्विघ्नपणे पार पाडावी, असं आवाहन पवार यांनी केलं. याप्रसंगी सोलापूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मुंबई इथं बैठक घेऊन पालखी सोहळ्यासाठी वारकऱ्यांना उत्तम सुविधा देण्याचे निर्देश दिले आहेत. यंदाच्या आषाढी एकादशी यात्रेसाठी मानाच्या 10 पालख्यांसोबतच्या 1 हजार 109 दिंड्यांना प्रती दिंडी 20 हजार रुपये याप्रमाणे एकंदर 2 कोटी 21 लाख 80 हजार रुपये अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत असल्याचा शासन निर्णय काल जारी करण्यात आला आहे.

<u>एसटी प्रादेशिक विभाग</u>

परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार सुनियोजन आणि निर्णयाचं विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूनं कर्नाटक परिवहन महामंडळाच्या धर्तीवर एसटी महामंडळातंर्गत 5 प्रादेशिक विभागांची निर्मिती करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचं परिपत्रक नुकतंच एस टी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर माधव कुसेकर यांनी काढले असून पुढील काही दिवसात हे प्रादेशिक विभाग स्वतंत्रपणे आपलं कार्यालय सुरू करणार आहेत.

<u>NEET निकाल</u>

वैद्यकीय पदवी प्रवेश परीक्षा नीट 2025 चा निकाल जाहीर झाला असून त्यात महाराष्ट्राच्या कृशांग जोशीनं तिसरा क्रमांक पटकावला आहे. राजस्थानच्या महेश जोशीनं प्रथम क्रमांक तर मध्य प्रदेशच्या उत्कर्ष अवधियानं दुसरा क्रमांक मिळवला आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या ntaneet.nic.in या संकेतस्थळावर तपशीलवार निकाल उपलब्ध आहे. देशभरातल्या 552 आणि देशाबाहेरच्या 14 शहरांमध्ये 4 मे रोजी आयोजित केलेल्या या परीक्षेला 22 लाखांहून अधिक उमेदवार बसले होते.

दरम्यान केंद्रीय अन्वेषण विभागाच्या मुंबई येथील विशेष न्यायालयानं नीट युजी 2025 परीक्षेशी संबंधित घोटाळ्यातील दोघा जणांना उद्यापर्यंत पोलिस कोठडी दिली आहे. पैशांच्या बदल्यात चांगल्या गुणांचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांची फसवणूक करण्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

प्रवेशोत्सव

आदिवासी विकास विभागामार्फत राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये उद्या नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात "शाळा प्रवेशोत्सव" या कार्यक्रमाद्वारे उत्साहात होणार आहे. या दिवशी प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत लोकप्रतिनिधी तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

क्रिकेट

जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत काल अंतिम सामन्यात दक्षिण अफ्रिकेनं ऑस्ट्रेलियाचा 5 गडी राखून पराभव करत अजिंक्यपद पटकावलं. 27 वर्षांनंतर दक्षिण आफ्रिकेला आय सी सी ची स्पर्धा जिंकण्यात यश आलं. काल सामन्याच्या चौथ्या दिवशी 213 धावांवरून पुढे खेळताना दक्षिण अफ्रिकेनं सलामीवीर शतकवीर आणि सामनावीर ठरलेल्या एडन मार्करमनं डेव्हिड बेडिंघमच्या साथीत संघाला विजयाच्या समीप नेऊन ठेवलं. कर्णधार बावूमानं 66 धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेकडून कॅगिसो रबाडानं 9 गडी बाद केले.

रत्नागिरी पाऊस

रत्नागिरी जिल्ह्यात दोन दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. राजापूर तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला. पावस बाजारपेठेमध्ये काही घरांमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झालं. पावसजवळच्याच गोळप गावात घरावर दरड कोसळली. मात्र सुदैवाने जीवितहानी झालेली नाही. गुहागर तालुक्यात साखरी आगरमध्येही दरड कोसळण्याची घटना घडली. आजही जिल्ह्याला लाल बावटा दाखवण्यात आला आहे. सांगली जिल्ह्यात दिवभरात अनेक ठिकाणी पावसाच्या सरी पडल्या. पुण्यातही काल खडकवासला धरणसाखळी परिसरात जोरदार पाऊस झाला.

हवामान

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह वीजांचा कडकडाट तसंच जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**